**शिरगाव-परंदवडी पोलीस स्टेशन, पिंपरी चिंचवड**
**पत्ता:- मौजे परंदवडी ता.मावळ जि पुणे ४१०५०६**
**दुरध्वनी क्रमांक – ०२११४-२३७४११**
**Email id:-pishirgaon.pcpc-mh@gov.in**

प्रेसनोट दिनांक :– १४/०९/२०२२

## शिरगांव परंदवडी पो.स्टे व गुन्हे शाखा युनिट ५ पिंपरी चिंचवड तपासपथकाने चांदखेड येथे झालेल्या अज्ञात इसमाच्या मृत्यु बाबत कौशल्यपुर्ण तपास करुन गुन्हयातील आरोपींना केले जेरबंद

पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालय, शिरगांव परंदवडी पोलीस स्टेशन अकस्मात मयत रजि. नं. ६/२०२२ सी.आर.पी.सी. १७४ मधील अनोळखी पुरुष जातीचे प्रेत मौजे चांदखेड गावचे हददीत रस्त्याचे कडेला गवतामध्ये मिळुन आले होते. सदर मयताचे तपासात संतोष हरिभाऊ येडे, पोलीस उपनिरीक्षक यांनी दिले फिर्यादीवरुन शिरगांव परंदवडी पोलीस स्टेशन गु.रजि.नं. ५२/२०२२ भा.द.वि.का.क ३०२, २०१ प्रमाणे दिनांक ०६/०९/२०१९ रोजी गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. दाखल गुन्हयाचा तपास व.पो.नि. वनिता धुमाळ यांनी तसेच गुन्हे प्रकटीकरण पथक व गुन्हे शाखा पिंपरी चिंचवड शहर असे तपास करीत असताना गुन्हयातील अनोळखी मयताचे नांव समाधान तारासिंग पवार, वय २६ वर्षे, रा. महागांव (मारखेड), ता. बार्शी टाकळी, जि. अकोला असे असल्याचे दिनांक ९/९/२०२२ रोजी निष्पन्न झाले आहे. सदर गुन्हयाचा मा. वरिष्ठांचे मार्गदर्शनाखाली तपास करत असताना व.पो.नि. वनिता धुमाळ व पोलीस स्टेशनचे तपास पथकातील स.पो.नि. उध्दव खाडे व पथकाने त्यांना मिळालेल्या बातमीवरून व तांत्रीक विश्लेषणावरुन (१) **समीर शहाबुद्दीन शेख वय ३७ वर्षे, रा. विदयानगर, जयभवानी वजनकाटया समोर, डी.जे. आर्टस प्रिंटींग प्रेस शेजारी, चिंचवड, पुणे १९ (२) सागर दयानंद पिल्ले, वय ३२ वर्षे, रा. विदयानगर, कोकरे मंडप समोर, घर नं. ११०८, चौधरी चाळ, चिचंवड पुणे १९ (३) सुरज दयानंद पिल्ले, वय ३२ वर्षे, रा. विदयानगर, कोकरे मंडप समोर,घर नं.११०८,चौधरी चाळ,चिचंवड पुणे १९** यांना विदयानगर, चिंचवड येथील वेगवेगळया ठिकाणाहुन शिताफीने ताब्यात घेवुन गुन्हा उघडकीस आणला. यातील मयत समाधान तारासिंग पवार व त्याचे इतर साथीदार यांनी पुर्वी यातील आरोपींना स्वस्तात सोने देतो असे अमिष दाखवुन आर्थिक फसवणुक केल्याचा राग मनात धरुन सदरचा गुन्हा केल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे. गुन्हयाचा समांतर तपास करीत असताना गुन्हे शाखा युनिट ५ पिंपरी चिंचवड शहर यांनी सदर गुन्हयातील **४) रविकुमार अरविंद राठोड वय ३१वर्षे, रा. मातोश्री बिल्डींग फ्लॅट नं. १ स्वरात चौक मांजरी ता. मुळशी जि. पुणे यांस मारुंजी येथुन तसेच ५) नितीन लक्ष्मण पवार वय १९ वर्षे, रा. एस.आर. अपार्टमेंट फ्लॅट नं. ४०२ अनंतानगर, लक्ष्मी चौक हिंजवडी ता. मुळशी जि. पुणे ६) अजित प्रभुराम ध्रुव, वय २२ वर्षे, रा. राजलक्ष्मी रियलकॉन बिल्डींगचे लेबर कॅम्पमध्ये हिंजवडी ता.मुळशी जि. पुणे मुळ रा. झीरिया ता. सिमगा जि. बलादाबाजार राज्य छत्तीसगड** यांना राजलक्ष्मी रियलकॉन बिल्डींगचे लेबर कॅम्पमधील बांधकाम चालु असलेल्या बिल्डींगचे ११ मजल्यावरुन शिताफीने ताब्यात घेवुन पोलीस स्टेशनला हजर केले तसेच गुन्हयाचा अधिक तपास करून शिरगाव परदंवडी पोलीस स्टेशन चे गुन्हे प्रकटीकरण पथक व गुन्हे शाखा ५ पिंपरी चिंचवड यांनी **७) हिलालाल उर्फ लाला मंका मोटे वय ३० वर्षे रा नेवाळेवस्ती चिखली पुणे** यास ताब्यात घेवु पोलीस स्टेशन येथे हजर केलेले आहे तरी सदर गुन्हयातील वरील सर्व आरोपींना अटक करण्यात आलेले असुन पोलीस कस्टडी मध्ये आहेत.

सदरची कारवाई पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्त श्री. अंकुश शिंदे, अपर पोलीस आयुक्त डॉ. श्री. संजय शिंदे, पोलीस उप आयुक्त गुन्हे श्री. काकासाहेब डोळे, पोलीस उप आयुक्त परिमंडळ २ श्री. आनंद भोईटे, सहा. पोलीस आयुक्त, देहुरोड विभाग श्री. पदमाकर घनवट, सहा. पोलीस आयुक्त गुन्हे प्रशांत अमृतकर यांचे मार्गदर्शनाखाली व.पो.नि. वनिता धुमाळ, गुन्हे प्रकटीकरण विभागाचे स.पो.नि. उध्दव खाडे, पो.उप.नि. संतोष येडे, स.फौ. नंदकुमार चव्हाण, पो.हवा./४४१ तुकाराम साबळे, पो.हवा./७१५ प्रशांत भोसले, पो.हवा./८८५ सुधीर वाडीले, पो.ना./१२३१ समिर घाडगे, पो.ना./१२५० योगेश नागरगोजे, पो.कॉ/२२४१ समाधान फडतरे तसेच गुन्हे शाखा युनिट ५ चे व.पो.नि. श्री. मनोज खंडाळे, पो.उप.नि. राहुल कोळी, सहा.फौज. किरनाळे, पो.हवा/७१८ बनसुडे, पो.हवा./९७६ बहिरट, पो.हवा./१००९ ठाकरे, पो.ना./१६०० मालुसरे, पो.ना./१९०० शेख, पो.कॉ/१३०३ ईघारे, पो.कॉ./१३०५ खेडकर, पो.कॉ. १८९८ गाडेकर, पो.कॉ./२५७१ गुट्टे तसेच तांत्रीक विश्लेषन विभागाचे पो.उप.नि. रमेश पवार, पो.हवा. माळी, पो.ना.पंडित, पो.कॉ. हुलगे यांनी केली आहे.

(आनंद भोईटे)
पोलीस उप आयुक्त
परिमंडळ २, पिंपरी चिंचवड शहर